मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : १३, जानेवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा





**दि. २६ जानेवारी, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने आतापर्यंत शैक्षणीक, संशोधन व विस्तार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. सर्वांच्या योगदानामुळे विद्यापीठाचे मानांकन २३ व्या स्थानापर्यंत उंचावले आहे. विद्यापीठाने विविध पिकांचे वाण, अवजारे व शिफारशींच्या माध्यमातून तसेच शुध्द स्वरुपातील बियाण्यांचा पुरवठा करुन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. विद्यापीठाने विकसीत केलेले एकात्मिक शेती पध्दतीचे मॉडेल जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या शेतात राबविण्याचे प्रयत्न चालू आहेत. जेणेकरुन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यासाठी त्याची मोठी मदत

होणार आहे. शेतीचे संपूर्ण यांत्रिकीकरण झाल्याशिवाय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार नाही. विद्यापीठाने शेतीचे आधुनिकीकरण तसेच यांत्रिकीकरण करण्यासंबंधीच्या संशोधनावर कास्ट प्रकल्पाच्या माध्यमातून भर दिला असून ड्रोन, कृत्रिम बुध्दीमत्ता, सेन्सर इ. क्षेत्रात विद्यापीठाचे काम दीपस्तंभासारखे आहे. कास्ट प्रकल्पाच्या माध्यमातूनच विविध गावात डिजीटल हवामान केंद्रे उभारली आहेत. यासारख्या प्रयत्नातूनच देश आत्मनिर्भर होण्यासाठी कृषि क्षेत्राचे योगदान महत्वाचे ठरणार असल्याचे प्रतिपादन प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहनप्रसंगी कुलगुरु डॉ. पाटील यांनी केले. या कार्यक्रमाला संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रकश्री. सुखदेव बलमे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. मिलिंद अहिरे, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. आनंद सोळंके, सुरक्षा अधिकारी गोरक्ष शेटे, एन.सी.सी. अधिकारी डॉ. सुनिल फुलसावंगे, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. कोव्हीड–१९ च्या पार्श्वभूमीवर सर्व नियमांचे पालन करुन प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानंतर कुलगुरु डॉ. पाटील यांच्या शुभहस्ते कर्मचारी निवासस्थानातील हॉलीबॉल मैदानाचे उद्घाटन करण्यात आले.

## मागोवा–2021 कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दि. ६ जानेवारी, २०२२.** शेतीचा खर्च कमी कसा करता येईल यावर संशोधन झाले पाहिजे. शहरातील लोकांची आरोग्याविषयीच्या जागृकतेचा फायदा सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर होणार आहे. या करीता बाजारपेठेचा विचार केला तर सेंद्रिय तसेच नैसर्गिक शेती शेतकऱ्यांना फायद्याची होईल असे प्रतिपादन नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त श्री. राधाकृष्ण गमे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठात मागोवा–२०२१ या हायब्रीड मोडमध्ये आयोजीत कार्यक्रमात उदघाटनपर भाषणात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. या कार्यक्रमासाठी अहमदनगरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले, अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र क्षीरसागर, पद्मश्री श्री. पोपटराव पवार, बीजमाता पद्मश्री सौ. राहिबाई पोपेरे, अन्नमाता सौ. ममताबाई भांगरे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, प्रभारी कुलसचिव डॉ. दिलीप पवार, नियंत्रक श्री. सुखदेव बलमे, विद्यापीठ अभियंता इंजि. मिलिंद ढोके उपस्थित होते.

श्री. गमे पुढे म्हणाले की कृषि संशोधनाच्या बाबत विकेल ते पिकेल याचा उपयोग करुन लोकांना संशोधनात काय पाहिजे याचा विचार करणे गरजेचे आहे. विद्यापीठांनी मोठ्या प्रमाणावर ब्रिडर बियाणे तयार केल्यास त्याचा फायदा बियाणे संशोधन करणाऱ्या संस्थांना होईल. यावेळी कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्य अतिशय मोलाचे आहे. विद्यापीठातून पदवी घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी कृषि क्षेत्रात उद्योजक बनून अनेकांना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. हे खऱ्या अर्थाने खरे आयडॉल आहेत. उत्कृष्ट पध्दतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा व कृषि उद्योजकांचा आपण प्रत्येक महिन्यात पोस्टरद्वारे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात प्रसिध्दी देवून त्यांचा योग्य प्रकारे सन्मान करण्याची प्रथा विद्यापीठात सुरु केली आहे.

जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले आपल्या भाषणात म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे योगदान ग्रामिण भागाबरोबरच बियाणे इंडस्ट्री, अन्न तंत्रज्ञान, मशीनरी इंडस्ट्री, प्रशासन तसेच परदेशातील फलोत्पादन व लॅडस्केप गार्डनींग या सारख्या व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. शेतीतील प्रयोगशील शेतकऱ्यांच्या तंत्रज्ञानाचा अंतर्भाव विद्यापीठाच्या संशोधनात व्हायला हवा तरच शेतीतील मजुरांचा प्रश्न सुटण्यास मदत हाईल. यावेळी श्री. पोपटराव पवार व सौ. राहिबाई पोपेरे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या वतीने श्री. पोपटराव पवार व सौ राहिबाई पोपेरे यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानीत करण्यात आल्याबद्दल त्यांचा सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल व श्रीफळ देवून सत्कार






करण्यात आला. यावेळी सौ. ममताताई भांगरे यांना सेंद्रिय शेतीमध्ये केलेल्या कामाबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. या निमित्ताने विद्यापीठाचे लोकप्रिय प्रकाशन कृषिदर्शनी २०२२ व कृषि दिनदर्शिका–२०२२ चे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. शरद गडाख यांनी केले. संचालक संशोधन डॉ. शरद गडाख यांनी सन २०२१ चा संशोधनाचा व विस्तार शिक्षणाचा आढावा सादर केला. अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ यांनी शिक्षणाचा आढावा, प्रभारी कुलसचिव डॉ. दिलीप पवार यांनी प्रशासनाचा आढावा, वित्त विभागाचा आढावा श्री. सुखदेव बलमे व विकास कामांचा आढावा श्री. मिलिंद ढोके यांनी सादर केला. याप्रसंगी सर्व सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. मिलिंद अहिरे आणि विभाग प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद सोळंके यांनी तर आभार डॉ. पंडित खर्डे यांनी मानले. हा कार्यक्रम कोव्हीड–१९ चे नियम पाळून फक्त ५० अधिकारी आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीत आयोजीत करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहाही जिल्हयातील अधिकारी, शास्त्रज्ञ, कर्मचारी आणि विद्यार्थी, शेतकरी मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते.

## श्री. राहुल रसाळ व डॉ. स्वप्निल बच्छाव हे आहेत जानेवारी महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स

**दि. १ जानेवारी, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील शेतकरी व महात्मा फुले कृषि विद्यापीठात पदवी घेतलेले यशस्वी कृषि उद्योजक यांचा परिचय समस्त शेतकरी वर्गाला आणि विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने कुलगुरु डॉ. पाटील यांनी नविन संकल्पना राबविली आहे. यामध्ये दर महिन्याला एक प्रगतशील शेतकरी व एक कृषि पदविचा कृषि उद्योजक यांच्या कार्याविषयी माहिती असलेला फलक विद्यापीठ प्रवेशद्वार, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दर्शनी भागात तसेच विद्यार्थी वसतीगृहाचा दर्शनी भागात या ठिकाणी लावण्यात येतो तसेच विद्यापीठाच्या दहा जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्रे आणि कृषि विज्ञान केंद्रे येथील प्रवेशद्वाराजवळ लावण्यात येतो जेणेकरुन संबंधीत प्रगतशील शेतकरी व कृषि उद्योजक यांच्या कार्याचा परिचय विद्यापीठाला आणि कृषि महाविद्यालयांना, कृषि संशोधन केंद्रांना व कृषि विज्ञान केंद्राना भेट देण्यासाठी येणाऱ्या शेतकरी, अधिकारी व विद्यार्थ्यांना होतो. तसेच या व्यक्तिंचा आदर्श घेऊन तरुण शेतकरी व पदवीधरांना प्रेरणा मिळते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये यांच्या दर्शनीय क्षेत्रात ही आयडॉल्स् प्रत्येक महिन्याला प्रदर्शीत करण्यात येतात.









जानेवारी २०२२ या महिन्याकरीता आयडॉल म्हणुन शिववाडी, निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथील श्री. राहुल रसाळ व कृषि उद्योजक म्हणुन राहुरी विद्यापीठातून कृषि विद्या या विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतलेल्या नाशिक येथील डॉ. स्वप्निल बच्छाव यांचा समावेश आहे. श्री. राहुल रसाळ यांनी शेतीचे संपूर्ण यांत्रिकीकरण, सबसरफेस ठिबक, स्वयंचलीत वेदर स्टेशन व वेदर डाटा संकलन केंद्र याच्या आधारे आपल्या ६५ एकर शेतीतून रासायनीक अवशेषमुक्त अन्नाची निर्मिती करण्यावर भर दिला आहे. कृषि उद्योजक असलेले डॉ. स्वप्निल बच्छाव हे रिचफिल्ड फर्टिलायझर्स प्रा. लि. व आदित्य स्पेशालीटी अ‍ॅग्रो न्युट्रीशन एल.एल.पी. या कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आहेत. या कंपन्यांद्वारे डॉ. बच्छाव यांनी भारतात प्रथमच विद्राव्य खतांच्या वापरासंबंधीचे तंत्रज्ञान देशाला दिले. या दोन्ही कंपन्यांमध्ये १५० पेक्षा जास्त कृषि पदवीधर अधिकारी पदावर कार्यरत आहेत.

## एकात्मिक शेती पध्दती या विषयावर प्रमाणपत्र अभ्यासक्रम कार्यक्रमाचे आयोजन





**दि. ३ ते २३ जानेवारी, २०२२.** वातावरणातील हवामान बदलाचा परिणाम शेतीवर मोठ्या प्रमाणावर होत आहे. यातुन शेती व शेतकरी वाचवायचा असेल तर पुर्वीच्या शेतीपध्दतीमध्ये बदल करुन एकात्मिक शेती पध्दतीचे मॉडेल आत्मसात करावे लागेल असे प्रतिपादन दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. शंकरराव मगर यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे जागतिक बँक अर्थसाहित भारतीय कृषि अनुसंधान परिषद, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्प कार्यरत असून महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व मोदिपूरम, उत्तरप्रदेशातील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या अंतर्गत असणाऱ्या शेती पध्दतीवरील भारतीय संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३ ते २३ जानेवारी, २०२२ या कालावधीत शाश्वत शेती करीता एकात्मिक शेती पध्दती या विषयावरील तीन आठवड्याचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम ऑनलाईन आयोजीत करण्यात आला होता. या अभ्यासक्रमाच्या समारोपाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. मगर बोलत होते. याप्रसंगी भारतीय शेती पध्दती संशोधन संस्थेचे संचालक डॉ. ए.एस. पनवार, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, सह संशोधक डॉ. मुकुंद शिंदे आणि प्रशिक्षणाचे

कोर्स डायरेक्टर डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणुन उपस्थित असलेले डॉ. ए.एस. पनवार आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की एकात्मिक शेती पध्दती हे परिपूर्ण विज्ञान असून या एकात्मिक पीक पध्दतीमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पटच नाही तर तीन पटीने वाढू शकते. हे तंत्रज्ञान शेती शाश्वत होण्याच्या दृष्टीने योग्य मार्ग आहे. कार्बनमुक्त अर्थव्यवस्था ही फक्त एकात्मिक शेती पध्दतीद्वारेच शक्य होईल. यावेळी डॉ. गडाख आपल्या भाषणात म्हणाले की विदर्भ व मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शेती धोरणात एकात्मिक शेती पध्दतीतील घटकांचा समावेश असल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण नगन्य आहे. राहुरी कृषि विद्यापीठाने तयार केलेल्या एकात्मिक शेती पध्दतीच्या मॉडेलमुळे महाराष्ट्राच्या अर्थकारणाला निश्चितच चालना मिळाली आहे. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. रसाळ यांनी केले. कास्ट कासम प्रकल्पाद्वारे आतापर्यंत घेतलेल्या प्रशिक्षणांचा आढावा डॉ. शिंदे यांनी सादर केला. डॉ. सुर्वे यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा सादर केला. यावेळी वैभव शेलार, अरुण बालाजी, मंजू टंडण, डॉ. व्ही.एम. जाधव व डॉ. जयंती चिन्नूसामी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रशिक्षणाच्या शेवटी घेण्यात आलेल्या समुह सादरीकरण स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषीके देण्यात आली. या प्रशिक्षणाचे निमंत्रक म्हणुन डॉ. एन. रविशंकर व डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी तर सह निमंत्रक म्हणुन डॉ. मुकुंद शिंदे यांनी काम पाहिले. डॉ. उल्हास सुर्वे यांनी कोर्स डायरेक्टर म्हणुन तर डॉ. मिराज अन्सारी व डॉ. आर.एम. गेठे यांनी प्रशिक्षणाचे सह आयोजक म्हणुन काम पाहिले. या प्रशिक्षणासाठी देशभरातून ६० प्रशिक्षणार्थींनी नोंदणी केली होती. सूत्रसंचालन डॉ. निलम कोंडविलकर व डॉ. रोहित सोनवणे यांनी केले तर आभार डॉ. मुकुंद शिंदे यांनी मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी डॉ. रघुविर सिंग व इंजि. मोहसीन तांबोळी यांनी प्रशिक्षण समन्वयक म्हणुन काम पाहिले.

## कुलगुरु डॉ. पाटील यांची बीज परीक्षण प्रयोगशाळेला भेट



**दि. ७ जानेवारी, २०२२.** राहुरीच्या बियाणे विभागाअंतर्गत बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेच्या बीज परीक्षण प्रयोगशाळेचा शेतकऱ्यांनी त्यांच्याकडील बियाणे चाचणी करून घेण्यासाठी फायदा घ्यावा. राहुरीच्या बियाणे तंत्रज्ञान संशोधन

योजनेकडील बीज परीक्षण प्रयोगशाळा ही महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेली आहे. या प्रयोगशाळेमध्ये बियाणे कंपन्या, शेतकरी उत्पादक कंपन्या त्यांचे बियाणे प्रयोगशाळेत बियाणे उगवण क्षमतेसाठी तपासले जाते. याबरोबरच शेतकऱ्यांनी सुद्धा त्यांच्याकडील बियाणे पेरणीपूर्वी या प्रयोगशाळेत तपासून घ्यावे असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेच्या भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. पाटील मार्गदर्शन करतांना बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलीक यांनी तंत्रज्ञान संशोधन योजना प्रक्षेत्र आणि प्रयोगशाळेतील विविध प्रयोगांना भेटी दिल्या. याप्रसंगी डॉ. गडाख म्हणाले या विभागात विविध विषयांवर होणारे संशोधन हे बियाणे उद्योगातील विविध भागधारकांसाठी खूपच लाभदायक आहे. या योजनेने मागील पाच वर्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर ३० शिफारशी दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. रसाळ यांनी बियाणे प्रक्रियेतील विविध प्रयोगांचे निष्कर्ष हे येणाऱ्या काळात उपयुक्त ठरतील असे सांगितले. बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेचे प्रमुख डॉ. विजय शेलार यांनी प्रकल्पाच्या कामाविषयी आणि उपलब्धी विषयी माहिती दिली. बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेस २०१५-१६ आणि २०१८-१९ असे दोन वेळेस राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट केंद्र म्हणून पुरस्कार मिळाला आहे. डॉ. सुरेश झांजरे, डॉ. बापूसाहेब पाटील, प्रा. रश्मी भोगे यांनी वेगवेगळ्या विषयांच्या प्रयोगांची माहिती दिली. या विभागातील इतर शास्त्रज्ञ डॉ. चंद्रकांत साळुंके, डॉ. अनिल सूर्यवंशी, डॉ. कैलास गागरे, डॉ. धनश्री सरनोबत, डॉ. नारायण मुसमाडे, श्री. युवराज पवार हे भेटी दरम्यान उपस्थित होते.

## राष्ट्रीय कार्यशाळेचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन



**दि. ७ जानेवारी, २०२२.** जलसंवर्धन आणि व्यवस्थापन या विषयी तयार केलेल्या विविध तंत्रज्ञानाचे व प्रकल्पाचे उद्दिष्ट्ये आणि महत्व विषद करुन या एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेतून विद्यार्थ्यांनी जल संवर्धन आणि व्यवस्थापन तंत्रज्ञानाविषयीची माहिती आत्मसात करावी असे या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे

अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. जागतीक बँक अर्थसहाय्यीत राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत संरक्षित लागवड तंत्रज्ञानासह जलसंवर्धन आणि व्यवस्थापन या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा महात्मा फुले कृषि विद्यापीठ येथे संपन्न झाली.

या प्रसंगी राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अजयकुमार उपाध्याय, भारतीय उद्यानविद्या संशोधन केंद्र, बेंगळूरू येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अनिल नायर, आरटीआय आंतरराष्ट्रीय जलसंवर्धन व्यवस्थापन, पुणेचे संचालक डॉ. डी. एस. पंडित, भारतीय जलव्यवस्थापन संस्था, भुवनेश्वरचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एस.के. जेना हे प्रमुख वक्ते कार्यशाळेसाठी लाभले होते. तसेच भारतीय जलव्यवस्थापन संस्था, भुवनेश्वरचे शास्त्रज्ञ डॉ. देबब्रता शेठी, शास्त्रज्ञ इजि. अजितकुमार नायर, तसेच हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थान प्रकल्पाचे प्रमुख सहसंशोधक डॉ. मुकुंद शिंदे, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, मृद व कृषि रसायनशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. अनिल दुरगुडे उपस्थित होते. या कार्यशाळेचे संयोजक व प्रकल्प प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार हे होते. तसेच प्रकल्पाचे सह प्रमुख संशोधन व कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. मुकुंद शिंदे यांनी केले. या प्रसंगी डॉ. उपाध्याय यांनी द्राक्ष पिकातील जल व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. नायर यांनी भाजीपाला पिकांकरीता संरक्षित लागवड या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. पंडित यांनी जलसिंचन व्यवस्थापनाकरीता निर्णय सहाय्य प्रणाली या विषयी मार्गदर्शन केले आणि डॉ. जेना यांनी पाणी व्यवस्थापनाकरीता रबर डॅम तंत्रज्ञान या विषयी माहिती दिली. या कार्यशाळेचे आयोजक सचिव म्हणुन सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनिल कदम यांनी काम पाहिले. तसेच या एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे नियोजन डॉ. शुभांगी घाडगे व डॉ. सेवक ढेंगे यांनी केले.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या शुभहस्ते युपीएससीतील यशस्वी विद्यार्थ्याचा सत्कार



**दि. २५ जानेवारी, २०२२.** अॅड. महेश बडाख यांनी जिद्द व अथक परिश्रमाच्या जोरावर खुप मोठे यश मिळविले आहे. अनाथ मुलाने अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत आश्रमात राहुन शिक्षण घेणे त्यानंतर नामांकित विधीज्ञांबरोबर काम करायला

मिळणे ही फार मोठी गोष्ट आहे. केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतील त्यांनी मिळविलेले यश हे आश्रमातील विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभासारखे असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. ॲड. महेश रामचंद्र बडाख याने देश पातळीवर प्रशासकीय पदांसाठी घेतल्या जाणाऱ्या परिक्षेमध्ये देशात २३ वा क्रमांक पटकवला असून त्याची देशातील महत्वाचे असलेले केंद्रिय ट्रेडमार्क आणि भौगोलीक संकेताचे परिक्षक या पदावर नियुक्ती झाली आहे. ॲड. बडाख यांच्या या यशाबद्दल विद्यापीठाच्या वतीने कृषिदर्शनी, मफुकृवि दिनदर्शिका, शॉल व पुष्पगुच्छ देवून कुलगुरुंच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी कुलगुरु डॉ. पाटील बोलत होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक श्री. सुखदेव बलमे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. राजेंद्र वाघ, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे, कृषि माहिती तंत्रज्ञान केंद्राचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय पाचारणे व गुहा येथील गंगाधर बाबा छात्रालयाचे व्यवस्थापक श्री. प्रकाश सपकाळ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. भगवान देशमुख यांनी केले. यावेळी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केला पाडेगावच्या शास्त्रज्ञांचा सन्मान



**दि. २० जानेवारी, २०२२.** आतापर्यंत आपण विक्रमी उत्पादन घेतलेल्या शेतकरी बांधवांचा सरकारच्या पातळीवर सन्मान झाल्याचे पाहिले आहे. परंतु विक्रमी ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांनी पाडेगाव ऊस संशोधन केंद्रावर येवून शास्त्रज्ञांचा सन्मान करण्याची अनोखी वाटावी अशी घटना नुकतीच घडली. पाडेगाव येथील प्रगतशील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर व संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांचा पाडेगाव येथे येवून सन्मान केला. यावेळी सातत्याने ९ वर्षांपासून एकरी शंभरटनांपेक्षा जास्त उत्पादन घेणारे त्याचबरोबर लागणीचे एकरी १२६ टन उत्पादन व खोडवा पिकाचे विक्रमी ११० टन उत्पादन घेणारे विकास चव्हाण यांनी सांगितले की पाडेगाव ऊस संशोधन

केंद्राचे डॉ. भरत रासकर यांच्या मार्गदर्शनामुळे ऊस पिकातील जास्तीत जास्त ऊस उत्पादनाचे सातत्य टिकवून ठेवता आले. याच ऊस शेतीतून वडीलोपार्जीत असलेल्या १२ एकर जमिनीतून आजमितीला ६० एकर क्षेत्र संयुक्त कुटुंबाचे झाले आहे व याच ऊस शेतीतून दिड कोटीचा बंगला बांधू शकलो असेही ते म्हणाले. ऊस विशेषज्ञ कार्यरत असेपर्यंत व निवृत्तीनंतरही इंटरनेटच्या माध्यमातून संपर्कात राहण्यासाठी विकास चव्हाण, गंगाधर पाखरे, राहुल सणस, विकास वाळुंज, सोमनाथ हुलगे, उत्तम जाधव, बाबाजी बांगर, सौरभ कोकीळ, राजेंद्र यादव, सोमनाथ पवार, माऊली सुरवसे, तुकाराम धायतोंडे, सोमनाथ पवार अशा १३ शेतकऱ्यांनी मिळून ऊस विशेषज्ञ यांना लिनोवा कंपनीचा लॅपटॉप भेट दिला व इतर शास्त्रज्ञांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. यावेळी विकास चव्हाण यांना महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाकडून ऊस भुषण पुरस्कार देवून गौरविण्यात आल्यामुळे ऊस विशेषज्ञ व पाडेगावचे सरपंच प्रतिनीधी राजेश खरात, अभिनव शाश्वत संस्था व नागरीक यांच्यातर्फे यावेळी गौरविण्यात आले. सत्काराला उत्तर देतांना डॉ. रासकर म्हणाले की विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील व संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाल्यामुळे व विक्रमी उत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांनी संशोधन केंद्रात येवून सत्कार केल्यामुळे आम्हा शास्त्रज्ञांना शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अधिक उर्जा मिळाली आहे. याप्रसंगी ऊस संशोधन केंद्रातील डॉ. रामदास गारकर, डॉ. सुरज नलावडे, डॉ. सुरेश उबाळे, तळेकर व इतर कर्मचारी तसेच पाडेगांव येथील माजी पंचायत समिती सदस्य अमरसिंह बुरुंगले, सुधीर डोंबाळे, मोरे, गोरे, देढे, चोरमले इ. उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुभाष घोडके यांनी केले.

## शेटफळेत स्वयंचलीत हवामान केंद्र



**दि. २० जानेवारी, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील जागतीक बँक अर्थसहाय्यीत भारतीय कृषि अनुसंधान परिषद, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन प्रकल्पांतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेटफळे, ता. आटपाडी, जि. सांगली येथे स्वयंचलीत हवामान केंद्राची व स्वयंचलीत पंप नियंत्रक आधारित सिंचन प्रणालीची उभारणे कारण्यात

आली व त्यावर आधारित काटेकोर सिंचन प्रणाली या एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षणासाठी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार व सह संयोजक डॉ. मुकुंद शिंदे यांचे सहकार्य लाभले. या प्रशिक्षणासाठी विस्तार कृषि शास्त्रज्ञ डॉ. अशोक पिसाळ, प्राध्यापक कृषि विस्तार डॉ. भारत कोलगणे व सहा. प्राध्यापक इंजि. अजय देशपांडे यांनी प्रशिक्षणामध्ये शेतकऱ्यांना काटेकोर सिंचन व्यवस्थापनावर पडणाऱ्या समस्यांचे निराकरण करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. इंजि. दत्तात्रय पवार यांनी फुले इरिगेशन शेड्युलर मोबाईल ॲपचा पाणी व्यवस्थापनासाठी वापर तर डॉ. प्रज्ञा जाधव यांनी स्वयंचलित पंप नियंत्रक आधारित सिंचन प्रणाली या विषयांवर व्याख्याने व प्रात्यक्षिके दिली. या कार्यक्रमासाठी सरपंच सौ. निता गायकवाड, उपसरपंच श्री. निवृत्ती गायकवाड, कृषि पारायण अध्यक्ष श्री. चंद्रकांत गायकवाड, श्री. सुनिल गायकवाड, प्रगतशील शेतकरी श्री. जगदिश गायकवाड उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता श्री. चंद्रकांत गायकवाड यांनी केली तर या प्रशिक्षणाचे आयोजक सचिव म्हणुन डॉ. सुनिल कदम व समन्वयक डॉ. अंजली मुसमाडे यांनी काम पाहिले.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी




**दि. ३ जानेवारी, २०२२.** वेळ विनाकारण व्यर्थ घालवू नका, जा आणि शिक्षण प्राप्त करा हा संदेश स्त्री शिक्षणाच्या आद्य क्रांतिकारक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना दिला. या संदेशामुळे भारतातील अनेक जातीधर्मातील स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडी झाली व स्त्रियांना शिक्षण घेता आले असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हळगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. अहिरे बोलत होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. अहिरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन केले. यावेळी

महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी सावित्रीबाई फुले यांचे बद्दल आपले विचार मांडले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे डॉ. चारुदत्त चौधरी, प्रा. कीर्ती भांगरे, डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. दत्तात्रेय पाचारणे, डॉ. बाळासाहेब काकड, प्रा. आत्तार, सौ.वैशाली पोंदे, सौ. ज्योती सासवडे उपस्थित होत्या.

## धुळे कृषि महाविद्यालयात ७५ दात्यांचे रक्तदान




**दि. २६ जानेवारी, २०२२.** धुळे कृषि महाविद्यालय येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ. देवकर यांनी कृषि महाविद्यालयात चालू असलेल्या नविन उपक्रमांची व विकास कामांची माहिती दिली. या प्रसंगी कृषि महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच आजादी का अमृतमहोत्सव या कार्यक्रमानिमित्त श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांच्यावतीने भव्य शासकीय रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण ७५ प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात विद्यार्थी कल्याण परिषद, जिमखाना विभाग व राष्ट्रीय सेवा योजना, कृषि महाविद्यालय, धुळे यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. कार्यक्रमास कृषि महाविद्यालयातील डॉ. एस.पी. सोनवणे, डॉ. सी.व्ही. पुजारी, डॉ. एम.एस. महाजन, डॉ. जी.बी. काबरे, डॉ. पांडुरंग शेंडगे, डॉ. पी.डी. सोनवणे, डॉ. व्ही.एस. गिरासे, डॉ. खुशाल बराटे, डॉ. टी.डी. पाटील, डॉ. संदिप पाटील, प्रा. बसाचे, प्रा. जे.एस. सुर्यवंशी, डॉ. के. बी. पाटील, डॉ. सुनिल पाटील, प्रा. पी.बी. देवरे, डॉ. डी. आर. नांद्रे तसेच सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पुणे कृषि महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिनाचे आयोजन




**दि. १२ जानेवारी, २०२२.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊसाहेब भोसले जयंतीनिमित्ताने आझादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय युवा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय लष्करातील माजी ब्रिगेडियर डॉ. सुनील बोधे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सेवा आणि त्याग हि धर्माचरणातील महत्वाची तत्वे आहेत. मोह, वासना आणि स्वार्थ यांचा त्याग करून सेवावृत्तीची दीक्षा घेऊन देशबांधवांसाठी जगावे असा संदेश स्वामी विवेकानंद यांनी दिला होता. आजची तरूण पिढी शुद्ध मानवता धर्माचे समर्थन करीत असल्यामुळे त्यागभावना व सेवाभाव यांच्या बळावर भारत जगाचे नेतृत्व करेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. आपल्या अध्यक्षीय भाषणात कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासाळकर यांनी विद्यार्थ्यांनी जीवनासमोर स्पष्ट ध्येय ठेवून वाटचाल करावी असे सांगितले. या कार्यक्रमास विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पाटील यांनी तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दिपक सावळे यांनी मानले. सूत्रसंचालन श्री. अनिकेत वाकळे व कु. ऋतुजा भोसले या स्वयंसेवकांनी केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री. अनिकेत वाकळे, कु. नेहा खरबडे, कु. शिल्पा गायकवाड, कु. श्रेया माने, श्री. ऋषिकेश होळकर, श्री. अभिषेक होळकर, कु. मीनल निम्हण, कु. प्रीती जंगम व श्री. धैर्यशील कांबळे या विद्यार्थी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : १३, जानेवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी



**दि. १२ जानेवारी, २०२२.** राजमाता जिजाऊ यांनी शिवाजी महाराजांसारखा पुत्र जन्माला घातला. जिजाऊंनी शिवाजी महाराजांना संघटन व व्यवस्थापन कौशल्य शिकवले. त्यांची शिकवण प्रत्येकाने स्वतः अंगीकारणे गरजेचे आहे. स्वामी विवेकानंद यांनी शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेत जगामध्ये शांतता नांदावी यासाठी मार्गदर्शन केले. स्वामी विवेकानंद हे प्रत्येक युवकाचे प्रेरणास्थान आहेत. अशा थोर व्यक्तींची शिकवण विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आचरणात आणावी असे प्रतिपादन हळगांव यंथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राजमाता जिजाऊ यांची जयंती व स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. मिलिंद अहिरे बोलत होते. या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जितेंद्र मेटकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. मेटकर यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद या दोन्ही महान व्यक्तींचे जीवन चरित्र विद्यार्थ्यांसमोर विषद केले. सुरुवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कोवीड–१९ नियमांचे पालन करून हा कार्यक्रम हायब्रीड मोडमध्ये घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी हे ऑफलाईल व ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले तर आभार विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. चारुदत्त चौधरी त्यांनी मानले.

## राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

**दि. २५ जानेवारी, २०२२.** भारत निवडणूक आयोगामार्फत शंभर टक्के मतदार यादी फोटोसह अपडेट करण्यात आलेली आहे. ज्यांची नावे मतदार यादी मध्ये समाविष्ट करावयाची असतील तसेच मतदार यादी मध्ये असणाऱ्या चुका दुरुस्त करावयाच्या असतील त्यांनी निवडणूक आयोगाचे वेबसाईटवर जाऊन दुरुस्ती करून घ्यावी. १ जानेवारी, २०२२ रोजी ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण आहे अशा सर्वांनी आपली नावे मतदार यादीत नोंदवून घेणे गरजेचे आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ,




राहुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव या महाविद्यालयात आजादी का अमृतमहोत्सव अंतर्गत ऑनलाइन राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी श्रीरामपूर येथील प्रांताधिकारी श्री. अनिल पवार यांनी विद्यार्थ्यांना निवडणूक साक्षरता व जनजागृती याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्वतःची व आपल्या नातेवाईकांना निवडणुकीमध्ये मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे असे प्रतिपादन अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला डॉ. रसाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले की महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या स्वतःची नोंद मतदार यादीमध्ये करून घेऊन आपल्या इतर सहकार्यांना सुद्धा मतदान करण्यास भाग पाडावे जेणेकरून मतदानाची टक्केवारीत वाढ होईल. उपस्थितांचे स्वागत विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. मनोज गुड यांनी केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. चारुदत्त चौधरी, डॉ. प्रेरणा भोसले, प्रा. कीर्ती भांगरे, सौ. अंजली देशपांडे, सौ वैशाली पोंदे, सौ ज्योती सासवडे, श्री अमृत सोनवणे व श्री. अनिल शेळके उपस्थित होते. आभार कुमारी प्रज्ञा घुले यांनी मानले.

# मफुकृवि ई वार्ता

जानेवारी २०२२




## शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत घेतलेल्या प्रात्यक्षिकांबद्दल शेतकऱ्यांनी व्यक्त केले समाधान






**दि. ११ जानेवारी, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ राबवत असलेल्या भारतीय कृषि अनुसंधान परिषद शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत रब्बी ज्वारी व हरभरा या पिकांची पीक प्रात्यक्षिके समाधानकारक आहेत. या प्रकल्पांतर्गत रब्बी हंगामात रब्बी

ज्वारी उत्पादन तंत्रज्ञान आणि हरभरा उत्पादन तंत्रज्ञानाची पीक प्रात्यक्षिके चिंचविहिरे, कणगर, तांभेरे आणि कानडगाव या ठिकाणी घेण्यात आली आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने प्रसारित केलेले फुले सुचित्रा व फुले रेवती हे रब्बी ज्वारी पिकाचे वाण तसेच हरभरा पिकाचे फुले विक्रम व फुले विक्रांत या वाणांसह शिफारशीत तंत्रज्ञानाचे अवलंबन या पीक प्रात्यक्षिकांमध्ये करण्यात आले आहे. या प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना हंगामपूर्व प्रशिक्षण कार्यक्रमात विद्यापीठ तज्ञाद्वारे प्रशिक्षित करण्यात आले. याबरोबर शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येत आहे. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे व त्यांचे सहकारी सहसमन्वयक हा प्रकल्प या चार गावांमध्ये राबवत आहे. नुकतेच विद्यापीठाचे कडधान्य प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.  नंदकुमार कुटे, वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. दिपक दुधाडे आणि प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी या पीक प्रात्यक्षिकांची पहाणी करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या चमुने चिंचविहिरे येथील सुनिल गाडे व गोरक्षनाथ शिंदे यांच्या रब्बी ज्वारी व हरभरा पीक प्रात्यक्षिकांची पहाणी केली. तसेच कणगर येथील प्रविण गाडे, तांभेरे येथील मेजर ताराचंद गागरे, आदिनाथ गागरे, सोन्याबापू मुसमाडे आणि कानडगाव येथील मधुकर गागरे यांच्या पीक प्रात्यक्षिकांना भेटी दिल्या. या रब्बी पीक प्रात्यक्षिकांबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या भेटीचे नियोजन संशोधन सहयोगी विजय शेडगे आणि प्रक्षेत्र सहाय्यक किरण मगर आणि राहुल कोऱ्हाळे यांनी केले.

## डॉ. अशोक वाळुंज उत्कृष्ट सादरीकरण पुरस्काराने सन्मानीत



**दि. ४ जानेवारी, २०२२.** भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत भारतीय फलोद्यान संशोधन संस्था, बेंगलोर व उद्यान विद्या परीसंस्थे अंतर्गत कीड व्यवस्थापन संघटना यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील फलोद्यान पीक संरक्षण या विषयावर तीन दिवसाच्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात देशपातळीवरील विविध संशोधन संस्था, विद्यापीठांच्या शास्त्रज्ञांनी सहभाग घेऊन आपले संशोधन पेपर सादरीकरण केले. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील उद्यानविद्या विभागातील किटकशास्त्रज्ञ डॉ. अशोक वाळुंज यांना डाळिंबावरील किड व्यवस्थापन या विषयावर सादरीकरणास उत्कृष्ट सादरीकरण पुरस्कार देण्यात आला. यावेळी सहा तांत्रिक सत्रात प्रत्येकी दोन उत्कृष्ट सादरीकरण पुरस्कार घोषित करण्यात आले. या प्रसंगी आय.एच.आर. बेंगलोर संस्थेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. श्रीधर, संचालक डॉ. रेड्डी, डॉ. मूर्ती, आय.सी.ए.आर. चे सहा. महासंचालक डॉ. पांडे, डॉ. दुबे, माजी उपमहासंचालक डॉ. कृष्णकुमार, डॉ. अब्राहीम, डॉ. उमा माहेश्वरी यांनी विविध विषयावर तांत्रिक मार्गदर्शन केले. डॉ. वाळुंज यांच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे संचालक डॉ. शरद गडाख, डॉ. प्रमोद रसाळ व सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

वर्ष :२, अंक क्रं. : १३, जानेवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## फेब्रुवारी महिन्यातील कामांचा तपशील

### भुईमूग (उन्हाळी)

- उन्हाळी भुईमूगास जमिनीच्या मगदुरानुसार ८–१० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.
- पेरणीनंतर चाळीस दिवसापर्यंत पीक तणविरहित ठेवावे. त्यासाठी वेळोवेळी कोळपणी व खुरपणी करावी. भुईमूगाच्या आऱ्या जमिनीत शिरण्याच्या आधी पिकास भर दयावी व त्यानंतर पिकातील आंतरमशागत करावी.
- पेरणीनंतर ३० दिवसांनी हेक्टरी १२५ किलो जिप्समचा दुसरा हप्ता दयावा. जिप्समची मात्रा पिकाच्या दोन ओळीत दयावी व नंतर कोळपणीकरुन जमिनीत मिसळावे.
- पेरणीनंतर ओळीत अंतर आढळून आल्यास बी टाकून ताबडतोब नांगे भरावेत.

### ऊस

- पूर्व हंगामी उसातील आंतरपिकाची अवस्था पाहून काढणी करावी.
- १२ ते १६ आठवडे झालेल्या उसाला नत्राचा तिसरा हप्ता द्यावा याकरीता हेक्टरी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) वापरावे.
- उसाची लागण सलग सरीमध्ये दोन ओळीतील अंतर मध्यम जमिनीसाठी १००–१२० सें.मी., भारी जमिनीसाठी १२०– १५० सें.मी.ठेऊन करावी अथवा ७५–१५० सें.मी. किंवा ९०–१८० सें.मी. पट्टा पध्दतीने लागण करावी.
- लागणीसाठी को.एम.–०२६५ (फुले २६५), को.८६०३२ (निरा), नवीन प्रसारीत वाण फुले १०००१, को.एम.१२०८५ (फुले ९०५७), को.९४०१२ (फुले सावित्री), को.सी. ६७१ या वाणांची निवड करावी. लागणीसाठी दोन डोळयांच्या टिपरीचा वापर करावा.
- बेणे मळयातील चांगले निवडून घेतलेले बेणेच ऊस लागवडीसाठी वापरावे. खोडवा ऊस लागणीसाठी वापरु नये. लागणीपूर्वी बिजप्रक्रियेसाठी ३०० मि.ली.मॅलॅथिऑन+१०० ग्रॅ बाविस्टीन (कार्बेन्डॅझिम)१०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे १०–१५ मिनीटे बुडवावे व नंतर ॲसिटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जीवाणू अनुक्रमे १० किलो आणि १.२५ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात टिपऱ्या ३० मिनीटे बुडवून लागणीसाठी वापराव्यात यामुळे नत्र खताची बचत होवून स्फुरद खताची उपलब्धता वाढते.
- सुरु उसाच्या लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र, ६० किलो स्फुरद, ६० किलो पालाश द्यावे. तसेच सुक्ष्मअन्नद्रव्यांची कमतरता असल्यास माती परीक्षणानुसार झिंक सल्फेट २० किलो, फेरस सल्फेट २५ किलो, १० किलो मॅंगेनीज सल्फेट व बोरॅक्स ५ किलो प्रती हेक्टरी शेणखतांत मिसळून सावलीत मुरवून रांगोळी पध्दतीने ४ ते ५ सें.मी. खोलीवर ही सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते द्यावीत. को.८६०३२ उसासाठी २५% रासायनिक खतांची जादा मात्रा द्यावी.
- मध्यम प्रतिच्या जमिनीत ओली लागण करावी, भारी व चोपण जमिनीत कोरडी लागण करावी.
- ऊस लागणीनंतर ४–५ दिवसांनी वापश्यावर हेक्टरी ५ किलो ॲट्राझीन (ॲट्रटाप) प्रति हेक्टरी १००० लिटर पाण्यात

विरघळून किंवा सेंकॉर (मेट्रीब्युझीन) १५०० ग्रॅ १००० लिटर पाण्यात मिसळून जमिनीवर फवारणी करावी, फवारणी करतांना फवारलेली जमीन तुडवू नये.

- खोड किडीच्या नियंत्रणासाठी उसाच्या शेतात प्रति हेक्टरी ५ कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) शेतात लावावे. आवश्यकता असल्यास क्लोरॅनट्रॅनिलीप्रोल ०.४% दाणेदार हे किटकनाशक १८.७५ किलो अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे किटकनाशक २५ ते ३० किलो प्रति हेक्टरी या प्रमाणात वापरावे.
- भविष्यात पाण्याचा ताण पडण्याची शक्यता असल्यास म्युरेट ऑफ पोटॅशची मात्रा शिफारशीत मात्रेपेक्षा २५% नी वाढवून द्यावी.
- ऊस तोडणीनंतर पाचट सरीत दाबून घ्यावे.
- उसाचे बुडखे मोकळे करुन धारदार कोयत्याने जमिनीलगत छाटून घ्यावेत व त्यावर ०.१% कार्बेन्डॅझिम (बाविस्टीन) फवारावे (१०० लिटर पाण्यात १०० ग्रॅ (बाविस्टीन) पाचटावर प्रति हेक्टरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट व १० किलो पाचट कुजविणारे जीवाणू शेणखतात अगर कंपोस्ट खतात मिसळून पाचटावर टाकावेत. रासायनिक खते व जीवाणू खते एकत्र वापरू नयेत.

### हरभरा व्यवस्थापन

- बागायती हरभऱ्याच्या विविध वाणांची पक्वतेनुसार काढ़णी व मळणी करावी.

### रब्बी ज्वारी

पहिला पंधरवडा

- कणसे उन्हात वाळवून झाल्यानंतर मळणी/उफणनी करावी व साठवणुकीपूर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी.

### गहू

- जरूरी भासल्यास तांबेरा रोग नियंत्रणासाठी दुसरी फवारणी पहिल्या फवारणी नंतर १५ दिवसाच्या अंतराने करावी.
- उंदरांच्या नियंत्रणासाठी विषारी आमिषांचा वापर करावा. आमिष तयार करण्याकरिता कोणत्याही धान्याचा जाडाभरडा ५० भाग त्यात एक भाग झिंक फॉस्फाईड मिसळावे. यामध्ये थोडेसे गोडेतेल टाकून चांगल्या प्रकारे मिश्रण तयार करुन प्रत्येक बिळामध्ये साधारणपणे एक चमचा मिश्रण काठीच्या सहाय्याने खोलवर टाकावे व बिळे पालापाचोळा व गवत टाकून झाकून घ्यावीत व बिळांची तोंडे चिखलाने बंद करावीत. तसेच पिंजऱ्याचा उपयोग करून उंदीर पकडावेत.
- गहू पीक पक्व होण्याच्या २-३ दिवस अगोदर पिकाची कापणी केल्याने गव्हाचे दाणे शेतात झडण्याचा प्रकार आढळत नाही.
- कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्के असावे.
- गहू बियाणे साठवणूकीच्या काळात सोंडे किडीच्या नियंत्रणासाठी उन्हात वाळविलेल्या बियाण्यास प्रति किलो १० ग्रॅम वेखंड भुकटीची बीजप्रक्रिया करावी.

वर्ष :२, अंक क्र. : १३, जानेवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

### फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब–नत्राचा उर्वरीत हप्ता द्यावा फुलकिडीचे जैविक पध्दतीने नियंत्रण करुन मधमाशी संवर्धन करावे, तेल्या रोगाचा प्रार्दुभाव टाळणे हंगामी प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात.
- सिताफळ – बिगर हंगामी लवकर फळे मिळण्यासाठी बागेत झाडांभोवती बाजरीची पेरणी करावी. शिफारशीत खतांच्या मात्रा द्याव्यात
- बोर – पक्व फळांची काढणी करावी.
- आवळा – बागेची स्वच्छता करावी.
- अंजीर – बागेची स्वच्छता करावी.
- जांभूळ – उर्वरीत खताची मात्रा द्यावी.
- मोसंबी – आंबे बहारासाठी शिफारशीत खतमात्रा (८००:३००:६०० ग्रॅम नत्र स्फुरद, पलाश) २० किलो शेणखत, १५ किलो निंबोळी पदे प्रति झाड द्यावे.
- मोसंबी कागदी लिंबू – झाडास दुहेरी आळे पध्दतीने पाणी द्यावे. कँकर / खैऱ्या रोग : स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम + कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यातुन फवारावे.

### भाजीपाला व्यवस्थापन

- रांगडा हंगामातील कांदा काढणीस तयार झाला असल्यास तीन आठवडे आधी कांद्याचे पाणी बंद करावे.
- रबी हंगामातील कांदा पीक दोन महिन्याचे झाले असल्यास नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा व पीक स्वच्छ ठेवावे.
- आवश्यकतेनुसार पीक नियंत्रणाचे उपाय योजावेत.
- उन्हाळी भाजीपाला पिकाची लागवड पूर्ण करावी.
- जानेवारी महिन्यात लागवड केलेल्या पिकाची खुरपणी करून नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा.
- वेलवर्गीय भाजीपाला पिकांना आधार देण्यासाठी मंडप (दुधी भोपळा) व इतर पिकांसाठी ताटी पध्दतीचा वापर करावा.
- कोबीवर्गीय पिकांचे गड्डे तयार झाले असल्यास काढणी करावी.
- वाटाणा पिकाची योग्य वेळी काढणी करावी.
- टोमॅटो पिकास खतांचा दुसरा हप्ता द्यावा व पीक संरक्षणाचे योग्य ते उपाय योजावेत.
- ढगाळ वातावरण असल्यास बुरशीनाशकांची फवारणी करावी.
- आवश्यकतेनुसार अन्नद्रव्यांचा वापर करावा.
- लसून पीक खुरपून स्वच्छ ठेवावे व पीक संरक्षणाचे योग्य ते उपाय करावे.
- उन्हाळी टोमॅटो लागवडीसाठी रोपे तयार झाली असल्यास लागवड करावी.
- टोमॅटो लागवडीचे वेळेस खत मात्रेच्या ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीचे वेळेस द्यावे.

### पाणी परिक्षण

बागायत क्षेत्रातील विहीरीतील किंवा कुपनलिकेतील पाणी पिण्यास मचुळ लागल्यास विद्राव्य क्षारांचे प्रमाण वाढल्याचे समजावे. या पाण्याची प्रयोगशाळेत तपासणी केल्यास क्षारांचे प्रमाण किती आहे हे समजते. पाणी क्षारयुक्त

असल्यास पिकांच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो. अशा पाण्यातून जमिनीचा निचरा चांगला होत नसल्यास क्षारांचे प्रमाण वाढत जाते. पाण्याचे बाष्पीभवन होवून विद्राव्य पांढरेक्षार जमिनीच्या पृष्ठ भागावर साठतात. यालाच आपण जमिनीला मीठ फुटले असे म्हणतो. या जमिनी क्षारयुक्त बनतात. पाण्यामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, क्लोराईड व सल्फेट या उदासीन क्षारांचे प्रमाण जास्त असल्यास जमिनीची घडण भुसभुसीत वाटते, परंतु पिकांच्या मुळांची वाढ खुटूंन पिके पिवळी पडतात. पाण्यामध्ये सोडियम क्षार हे कार्बो नेट किंवा बायकार्बोनेट सारख्या अणुबरोबर असल्यास जमिनीची घडण अतिशय कठीण होते. त्यासाठी पाण्यामध्ये कोणत्या प्रकारचे क्षार आहेत हे पाणी परिक्षणाद्वारे प्रयोगशाळेत समजते.

पाणी नमुना घेण्याची पध्दत : पाणी पृथ:करणासाठी एक लिटर पाणी पुरेसे होते. पाणी स्वच्छ प्लॅस्टिक बाटलीत घ्यावे. बाटली साबण/डिटर्जंट पावडरने धुवू नये. विहीरीतील किंवा कुपनलीकेतुन पाणी घेताना विद्युतपंप सकाळी १५ ते २० मिनिटे चालवावा. नदी, ओढे व कॅनॉलमधील पाणी नमुना वाहत्या पाण्यामधुन घ्यावा. पाण्यात तरंगणारे शेवाळ, काडीकचरा गाळुन पाणी बाटलीत भरावे. घट्ट झाकण बसवुन नमुना प्रयोगशाळेत ४८ तासाच्या आत पाठवावा. बाटलीसोबत शेतकऱ्याचे नाव, पत्ता, नमुना घेतल्याची दिनांक, नमुना कशातून घेतला याबाबत माहीतीसह पाठवावा.

## क्षारयुक्त पाणी जमिनीस वापरताना घ्यावयाची काळजी

- हलक्या ते मध्यम चांगला निचरा असलेल्या जमिनीस क्षारयुक्त पाणी वापरावे. काळया खोल जमिनीस बाजुने चर खोदुन अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.
- सेंद्रिय खतांचा (शेणखत, कंपोस्टखत, गांडुळखत इ.) वापर प्रत्येक पिकास शिफारसी नुसार करावा.
- दोन ते तीन वर्षातुन एकदा तरी धैंचा किंवा ताग जमिनीत फुले सुरु होताच गाडावा.
- क्षारयुक्त पाणी चांगले पाण्यात मिसळून पिकांना दयावे किंवा आलटुन पालटुन दयावे.
- क्षारयुक्त पाण्याचा वापर अमर्याद न करता मर्यादीत हलके परंतु वारंवार दयावे.
- तुषार किंवा ठिबकसिंचनाद्वारे पिकांना पाणी दयावे.
- पेरणीसाठी बियाणांचा १५ ते २० टक्के शिफारसीपेक्षा जास्त वापर करावा.
- पिकांची लागवड सपाट वाफ्यात न करता सरी वरंबा पध्दतीने करुन लागवड वरब्यांच्या बगलात करावी.
- क्षार प्रतिकारक पिकांची निवड करावी उदा. गहु, बाजरी, मका, वारी, सोयाबीन, कापुस, ऊस, वांगे, कोबी, पालक, शुगरबीट, आवळा, पेरु, चिक्कू इ.
- मात्र क्षारसंवेदनशील पिकांची लागवड करु नये. उदा. वाटाणा, मुग, उडीद, चवळी, तीळ, घेवडा आणि लिंबुवर्गीय फळपिके (संत्रा, मोसंबी, लिंबू), स्ट्रॉबेरी इ. अशाप्रकारे पाण्यात क्षार असल्यास वरीलप्रमाणे बाबींचा अवलंब करुनच मचुळ पाण्याचे व्यवस्थापन करावे.

## आले

- आले लागवडीसाठी निवड केलेला प्लॉट १००% सुप्त अवस्थेत गेल्यानंतर फेब्रुवारी महिन्यात बियाणे काढणी प्रक्रिया करावी.
- काढलेल्या बियाण्यास सुर्यप्रकाशाची तीव्रता मिळणार नाही याची काळजी घ्यावी.

- काढलेले बियाणे थोडेफार ओलसर असते ते झाडांच्या किंवा छपराच्या सावलीत सुकवावे. हे सुकलेले बियाणे निवड करुन (खराब तुकडे,जुन्या बियाणांचा तुकडा) थंड ठिकाणी छपराच्या किंवा कौलारु घरात आढी लावून त्यावर गोनपाटाचे बारदानाने पूर्णपणे झाकून ठेवावे.
- आढी लावताना त्यास मुंग्या, वाळवी व इतर किड रोगांपासून संरक्षित राहील याची काळजी घ्यावी.
- आढीत ठेवलेले बियाणे दोन ते अडीच महिन्यापर्यंत सुरक्षित राहु शकते.

**अवजारे**

मनुष्यचलीत फुले शेवगा काढणी झेला
- एका तासात ९० ते १०० शेंगा काढता येतात.
- शेंगाला इजा होत नाही.
- उंच झाडावरील शेवग्याच्या शेंगा काढण्यासाठी उपयुक्त.

प्रकाशक : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण
प्रमुख संपादक : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
सहसंपादक : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
डिझाईनर : **श्री. खेमचंद खैरनार**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
प्रसारण केंद्र
**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४२१/२०२२**